POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१४ ● मुंबई, गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## दादरच्या कबुतरखाना परिसरात तणाव

# बंदीच्या समर्थनार्थ मराठी एकीकरण समितीचे आंदोलन, अनेक आंदोलक ताब्यात



**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील दादरच्या प्रसिद्ध कबुतरखाना परिसरात सध्या तणावाचे वातावरण आहे. मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरखाना बंद ठेवण्याचा आदेश दिल्यानंतरही काही लोक न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करत आहेत. या विरोधात मराठी एकीकरण समितीने आज (13 ऑगस्ट) आंदोलन पुकारले. आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत कबुतरखाना परिसरात गोंधळ घातला, त्यामुळे पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले आहे.

या आंदोलनात संयुक्त मराठी चळवळीच्या लोकांनीही पाठिंबा दर्शवला. पोलिसांनी आंदोलकांना नोटीस बजावली होती, तसेच जमावबंदी आदेश (Curfew Order) लागू असल्याचेही सांगितले होते. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आंदोलक जबाबदार असतील असा इशाराही दिला होता. मात्र, तरीही आंदोलनकर्ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

**आंदोलक आणि पोलिसांमध्ये तणाव**

आंदोलनामुळे कबुतरखाना परिसरात सकाळपासूनच मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राज्य राखीव पोलीस दलाची तुकडीही तिथे उपस्थित होती.

यावेळी अनेक आंदोलक डोक्यावर टोपी घालून जोरदार घोषणाबाजी करताना दिसले. मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांना पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले. आम्हाला आमची भूमिका मांडू द्या, आम्ही फक्त निवेदन देण्यासाठी आलो आहोत, असे देशमुख यांनी सांगितले.

**जैन मंदिराचा दरवाजा बंद**

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कबुतरखाना परिसरातील दुकाने दुपारी 1 वाजेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. तसेच, जैन मंदिराचा मुख्य दरवाजाही सकाळपासून बंद ठेवण्यात आला होता.

**कबुतरखान्याचा वाद का पेटला?**

उच्च न्यायालयाने दादरचा कबुतरखाना बंद करण्याचा आदेश दिल्यानंतरही, काही लोक जैन मंदिराशेजारील इमारतीच्या छतावरून कबुतरांना दाणे टाकत आहेत, असा स्थानिक रहिवाशांचा आरोप आहे. यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. यावर प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

याच वादातून काही दिवसांपूर्वी जैन मुनींनी शस्त्र उगारण्याची भाषा वापरली होती, ज्यामुळे हा वाद आणखी चिघळला. त्याला उत्तर देण्यासाठी मराठी एकीकरण समितीने हे आंदोलन पुकारले आहे. समितीच्या मते, कबुतरखान्याचा विषय हा धार्मिक नसून सामाजिक आहे.

## जैन लोकांनी आंदोलन केलं ते चाललं, आम्हाला मात्र ताब्यात घेतलं, हा दुजाभाव का?



### आणीबाणीचा काळ आणू नका

**मराठी एकीकरण समितीने पूर्वनियोजितप्रमाणे आज आंदोलन करण्याची घोषणा केली होती, मात्र पोलिसांनी यासाठी परवानगी नाकारली होती. त्याचबरोबर काल रात्रीच समितीच्या कार्यकर्त्यांना नोटीस पाठवून कारवाईचा इशाराही दिला होता. तरीदेखील, आज सकाळी सुमारे ११ वाजता समितीचे अनेक कार्यकर्ते दादर कबुतरखान्याजवळ दाखल झाले. यामध्ये समितीचे पदाधिकारी गोवर्धन देशमुख स्वतः उपस्थित होते. देशमुख यांनी पोलिसांना भेटून निवेदन देण्याची मागणी केली. मात्र, त्यांनी परिसरात पाऊल टाकताच पोलिसांची एक तुकडी त्यांच्या भोवती गोळा झाली. काही मिनिटांतच त्यांना ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या वेळी देशमुख यांनी, आम्ही फक्त पोलिसांना सहकार्याची अपेक्षा करतो. आंदोलनावर बंदी घालून आणीबाणीचा काळ आणू नका, असे वक्तव्य केले. मात्र, त्यांच्या अटकेच्या हालचालींमुळे मराठी एकीकरण समितीचे कार्यकर्ते आक्रमक झाले. परिस्थिती तणावपूर्ण होत असतानाच अखेर पोलिसांनी गोवर्धन देशमुख यांना पकडून थेट गाडीत बसवले. या कारवाईनंतर समितीच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली.**

**■मुंबई । प्रतिनिधी,**

दादर कबुतरखाना परिसरात घडलेल्या ६ ऑगस्टच्या घटनेचा मुद्दा पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. मराठी एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी यावर पोलिस प्रशासन आणि सरकारला सरळ प्रश्न विचारले आहेत. समितीच्या मते, त्या दिवशी जैन समाजाच्या काही लोकांनी आंदोलन करताना पोलिसांशी वाद घातला, चाकू-सुऱ्यांच्या मदतीने कबुतरखान्यावरील ताडपत्री फाडून काढली. इतकंच नव्हे, तर काहींनी उघडपणे शस्त्र उचलण्याची भाषा केली. तरीही पोलिसांनी त्या घटनेत सामील असलेल्या एकाही जैन धर्मीयावर गुन्हा दाखल केला नाही. समितीच्या कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, आज मराठी माणूस शांततेत, कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन करत असताना त्याला अटक करण्यात येत आहे. शस्त्रं काढण्याची धमकी देऊनही जर कोणावर कारवाई होत नसेल, तर ही न्यायव्यवस्थेतील दुटप्पी वागणूक नाही का?ह असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

याच पार्श्वभूमीवर समितीचे पदाधिकारी गोवर्धन देशमुख यांनी संताप व्यक्त करत म्हटलं, एरवी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणत्याही विषयावर बोलतात, मग यावर का मौन बाळगतात? ६ ऑगस्टला तुम्ही कुठे होतात? त्या दिवशी पोलिसांनी आम्हाला नाही, तर जैन समाजाच्या आक्रमक आंदोलकांना रोखायला हवं होतं. पण त्याऐवजी आज मराठी माणसालाच पकडलं जातंय. पोलिसांनी मला मारहाण केली, माझं रक्त काढलं म्हणजे मराठी माणसाचंच रक्त सांडलं.

**तर मग मराठी माणसांना तोच न्याय का मिळत नाही?**

आज सकाळपासूनच दादर कबुतरखान्याच्या परिसरात पोलीस सतर्क मोडमध्ये होते. अतिरिक्त कुमक मागवून कडेकोट बंदोबस्त उभारण्यात आला होता, तर परिसरातील अनेक दुकानं बंद ठेवण्यात आली. यावेळी मराठी एकीकरण समितीचे कार्यकर्ते ठिकाणी पोहोचताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्यांना गाड्यांमध्ये कोंबण्यास सुरुवात केली. पदाधिकारी गोवर्धन देशमुख यांना तर अवघ्या काही मिनिटांतच पोलिसांनी पकडून थेट गाडीत बसवले आणि पोलीस ठाण्यात रवाना केले. या जलद कारवाईमुळे कार्यकर्त्यांचा रोष अधिक वाढला. विशेष म्हणजे, कार्यकर्त्यांकडून असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे की, ६ ऑगस्टला जैनधर्मीयांना कोणत्याही अडथळ्याविना आंदोलन करण्याची मुभा देण्यात आली, तर मग मराठी माणसांना तोच न्याय का मिळत नाही?

## पुरुषाचे रूप घेऊन वृद्ध सासऱ्याच्या घरी दरोडा टाकणाऱ्या महिलेचा पदार्फाश झ्र ₹१.५० कोटींचा मुद्देमाल हस्तगत



**■वसई । प्रतिनिधी,**

पुरुषाचे रूप धारण करून बहीणीच्या वयोवृद्ध सासऱ्याला बाथरूममध्ये कोंडून तब्बल ₹१,५०,८४,०५०/- किंमतीचे सोनं-चांदी लंपास करणाऱ्या एका महिलेचा पदार्फाश करत मध्यवर्ती गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी, दुपारी १.३० वाजता, फियार्दी ओधवजी खिमजी भानुशाली, वय ६६ वर्षे, यांच्या राहत्या घरी एक अज्ञात व्यक्ती 'रुम पाहण्याच्या बहाण्याने' आली. त्यानंतर बाथरूम वापरण्याचा बहाणा करत फियार्दीला बाथरूममध्ये कोंडले व बेडरूममधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले.माणिकपूर पोलीस ठाण्यात त गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या तपास पथकाने ७५ ते ८० सीसीटीव्ही फुटेज तपासले. सीसीटीव्हीमध्ये चोरीनंतर एक महिला मुद्देमाल उचलून नेताना दिसली, पण पुरुष चोर दिसला नाही. यावरून हा 'पुरुष' चोर प्रत्यक्षात महिला असल्याचा संशय अधिक बळावला. तांत्रिक विश्लेषण व तपासाअंती निष्पन्न झाले की, ही महिला म्हणजेच ज्योती मोहन भानुशाली (वय २७), ही फियार्दीच्या नातेवाईकाची सून आहे. गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातील गणदेवी पोलीस ठाण्याच्या मदतीने, आरोपी महिलेची ओळख पटवून तिला अटक करण्यात आली. चौकशी दरम्यान तिने गुन्हा कबूल केला.

चोरी केलेले १४९०.८६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २३२० ग्रॅम वजनाचे चांदिचे दागिने असा रुपये १,५०,८४,०५०/-किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. निकेत कौशिक, मिरा भाईंदर वसई विरार यांनी केलेल्या आदेशाप्रमाणे तसेच मा. अपर पोलीस आयुक्त श्री. दत्तात्रय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. संदिप डोईफोडे सो व मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोनि श्री. अविराज कुराडे, सपोनि श्री. प्रशांत गांगुर्डे, सपोनि श्री. दत्तात्रय सरक, सपोउपनि संतोष मदने, मनोहर तावरे आसिफ मुल्ला, पोहवा प्रविणराज पवार, समीर यादव, शिवाजी पाटील, धनजंय चौधरी, गोविंद केंद्रे, रविंद्र भालेराव, विकास राजपुत, रविंद्र कांबळे, हनुमंत सुर्यवंशी, विजय गायकवाड पोअंम नितीन राठोड, अंगद मुळे व मसुब सचिन चौधरी तसेच सपोउनि संतोष चव्हाण, नेम सायबर गुन्हे यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास माणिकपुर पोलीस ठाणे मार्फत करण्यात येत आहे.

## सायबर फसवणुकीतील २१.३० लाखांची रक्कम पालघर पोलिसांनी वाचवली!

**■पालघर। प्रतिनिधी,**

सायबर गुन्हेगारीमध्ये फसवणूक झालेली ₹२१,३०,५००/- इतकी रक्कम पालघर जिल्हा पोलिसांच्या तात्काळ आणि प्रभावी कारवाईमुळे विविध बँक खात्यांमध्ये गोठवण्यात यश आले आहे. बोईसर पोलीस ठाणे व सायबर पोलीस ठाणे, पालघर यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे १००% रक्कम सुरक्षित करण्यात आली आहे.दि. ३१ जुलै २०२५ रोजी, श्री. प्रमोद ठक्या घरत (वय ६२), रा. म्हाडा कॉलनी, बोईसर, हे हायहोल्ट इलेक्ट्रील्स प्रा. लि., टक्ळ्ळ बोईसर येथील मोबाईलवर एका अज्ञात व्यक्तीकडून "NOTICE OF DISCONNECTION" असा व्हॉट्सॲप संदेश प्राप्त झाला. संदेशात टक्ळ्ळ कार्यालयातर्फे बोलत असल्याचे भासवून रात्री ९.३० वाजता वॉटर कनेक्शन बंद होणार असल्याचे सांगण्यात आले. याच संदर्भात "Water Bill Update-1.apk" ही ॲप फाईल पाठवून, ती डाऊनलोड करून बँक तपशील भरावयास सांगण्यात आले.सदर फाईल डाऊनलोड करून माहिती भरताच, कंपनीच्या खात्यातून एकूण ₹२१,३०,५००/-ची रक्कम वेगवेगळ्या खात्यांत ट्रान्सफर करण्यात आली.या प्रकरणी १ ऑगस्ट २०२५ रोजी १४.३६ वाजता, बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेनंतर, श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री. शिरीष पवार (बोईसर) यांनी तात्काळ आयसीआयसीआय बँकेशी संपर्क साधून संबंधित खात्यांवरील व्यवहार थांबवले. सायबर पोलीस ठाणे पालघर यांना माहिती देण्यात आली. फियार्दींना तात्काळ १९३० या हेल्पलाईनवर कॉल करण्याचे सुचवण्यात आले. कंपनीचे संचालक प्रफुल्ल शहा यांनी National Cyber Crime Reporting Portal (NCCRP) वर तक्रार दाखल केल्यानंतर, सायबर सेल, पालघर यांनी अत्यंत जलदगतीने काम करत रक्कम ट्रॅक व होल्ड केली. अखेरीस, संपूर्ण ₹२१,३०,५००/- रक्कम परत मिळवण्यात आली. सदर प्रकरणाचा तपास बोईसर पोलीस ठाणे आणि सायबर पोलीस ठाणे, पालघर यांच्या संयुक्त पथकाद्वारे सुरू आहे. आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. सदरची कामगिरी श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक, शिरीष पवार, बोईसर पोलीस ठाणे तसेच पोउपनि/रूपाली गुंड, पोउपनि/भोसले, पोअं/रूपेश पाटील, पोअं/जिग्नेश तांबेकर सर्व नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर यांनी केलेली आहे.

## पालघर पोलीसांचा मोठा खुलासा:

# दांडेकर कॉलेजमधील ११.२५ लाखांची चोरी उघडकीस, ४ आरोपी गुजरातमधून अटकेत

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**




दांडेकर कॉलेज, पालघर येथील अकाउंट विभागाच्या तिजोरीतून ११ लाख २५ हजार रुपयांची चोरी झाल्याच्या प्रकरणाचा पालघर पोलीसांनी पदार्फाश केला असून, गुजरात येथून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून ४.०५ लाख रुपये रोख देखील जप्त केले आहेत. ही घटना २३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते २४ जुलै रोजी सकाळी ७.४५ वाजताच्या दरम्यान घडली. याबाबत फिर्यादी श्री. मनोज शंकर परब (वय २७) यांनी पालघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक श्री. यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे, पुढील आरोपींचा शोध घेण्यात आलाः 1)शुभम विरेंद्र सिंग (वय २१) - रिक्षा चालक, उंबरगाव, गुजरात 2)मुरली मनोहर पवार (वय २३) -रिक्षा चालक, उंबरगाव, गुजरात,3) अरुण लखन चव्हाण (वय १९) - मिस्त्री, देवधाम, उंबरगाव, गुजरात, 4) फारुख फिरोज खान - उंबरगाव, गुजरातसदर आरोपींना उंबरगाव येथून ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून ४,०५,०००/- रुपये रोख हस्तगत करण्यात आले आहेत.सदर गुन्ह्याचा पुढिल तपास हा पोउपनि/ धनाजी काळे, नेमणुक पालघर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदशार्नाखाली पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, पोउपनि/ रविंद्र वानखेडे, पोउपनि/ गोरखनाथ राठोड, पोहवा/ दिनेश गायकवाड, पोहवा/कैलास पाटील, पोहवा / भगवान आव्हाड, पोहवा/ राकेश पाटील, पोहवा / संदीप सरदार, पोअं/ विशाल कडव, पोअं/ महेश अवतार सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तसेच पोउपनि/रुपाली गुंड, पोअं/ रोहित तोरस्कर नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मध्य प्रदेशात 'शिक्षण जिहाद!'

'लव्ह जिहाद', 'लॅण्ड जिहाद' आणि 'ड्रग्ज जिहाद' नंतर आता 'शिक्षण जिहाद' नामक आणखीन एक भयंकर प्रकार मध्य प्रदेशातील शाळेत नुकताच उघडकीस आला. त्यामुळे नेमका हा काय प्रकार आहे, ते समजून घेण्याबरोबरच पालकांनीही आपल्या पाल्याच्या पाठ्यपुस्तकांतून नेमके कुठले धडे दिले जात आहेत, याबाबत सजग राहणेही तितकेच आवश्यक! मध्य प्रदेशातील रायसेन जिल्ह्यातील एका खासगी शाळेतील नर्सरीसाठी शिकविल्या जाणार्या पुस्तकांमधून मुलांच्या मनावर एका विशिष्ट धमार्ची माहिती बिंबवली जात असल्याचे उघडकीस आले आहे. या शाळेमध्ये 'के' काबाचा, 'एन' नमाजाचा आणि 'एम' मशिदीचा असे शिक्षण दिले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याची हिंदू समाजामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटली. 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे'ने त्या शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली, तर 'विश्व हिंदू परिषदे'ने राज्यामध्ये 'शिक्षण जिहाद'ची प्रकरणे वाढत चालली असल्याकडे लक्ष वेधले. ज्या शाळेत असे शिक्षण दिले जात आहे, ती शाळा इंग्रजी माध्यमाची असून, पाठ्यपुस्तकांमध्ये इंग्रजीत 'के' काबाचा, 'एन' नमाजाचा, ह्यएमह्ण मशिदीचा असे उल्लेख करण्यात आले आहेत. तसेच, 'ओ' म्हणजे हिजाब परिधान केलेली महिला असा उल्लेख करण्यात आला आहे. एका विद्यार्थ्याच्या पालकाच्या निदर्शनास हे सर्व आल्यानंतर त्यांना तर धक्काच बसला. त्यानंतर पालकांनी 'अभाविप'च्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधून त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. 'अभाविप'ने त्या शाळेसमोर निदर्शने केली आणि शाळेची मान्यता रद्द करावी, अशी मागणी केली. पाठ्यपुस्तकातील हा उल्लेख म्हणजे सनातन संस्कृतीविरुद्धचा कट असल्याचा आरोप 'अभाविप'ने केला आहे. शाळेचे प्राचार्य इ. ए. कुरेशी हे शिक्षणाचे 'इस्लामीकरण' करीत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी स्थानिक पोलिसांनी हस्तक्षेप केला आणि संबंधित शाळेविरुद्ध रीतसर तक्रार करण्यात यावी, असे पोलिसांनी त्यांना सांगितले. ज्या शाळेत हा सर्व प्रकार घडला, त्या शाळेमध्ये ५०० मुले शिकत असून, त्यामधील बहुतांश मुले हिंदू आहेत. सदर शाळा मदरसा नसूनही त्या शाळेत एका विशिष्ट धमार्चे शिक्षण दिले जात असल्याबद्दल 'अभाविप' संघटनेने आणि पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकरणी 'बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोग', 'मानवी हक्क आयोग', 'बाल हक्क' विषयक राज्य आयोग यांच्याकडे तक्रार करण्यात येणार आहे. या सर्व प्रकरणी शाळेचे प्राचार्य कुरेशी यांच्याकडे विचारणा केली असता, 'पुस्तकात काय छापण्यात आले आहे, याची शहानिशा न करताच सदर पुस्तकांचे वाटप करण्यात आले,' अशी कबुली त्यांनी दिली. 'विश्व हिंदू परिषदे'चे राष्ट्रीय प्रवक्ते विनोद बन्सल यांनी, 'जिहाद'च्या नावाखाली 'लव्ह जिहाद', 'धर्मांतर जिहाद', 'लॅण्ड जिहाद' असे प्रकार राज्यात घडत असल्याकडे लक्ष वेधले. त्यामध्ये आता 'शिक्षण जिहाद'ची भर पडली आहे! 'शिक्षण जिहाद'चे प्रकार दामोह, ग्वाल्हेर, जबलपूर आणि सागर भागांत घडले असल्याचे बन्सल यांनी लक्षात आणून दिले. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाचा तपास करावा आणि दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात बोलताना जिल्हा शिक्षण अधिकारी डी. डी. रजक म्हणाले की, 'हे सर्व प्रकरण अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात चौकशी सुरू करण्यात आली आहे,' असे त्यांनी सांगितले. मध्य प्रदेशमधील एका शाळेत घडलेला हा प्रकार पालकांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला. असे प्रकार अन्यत्र कोठे सुरू आहेत, याची सखोल चौकशी करायला हवी. तरच असे 'उद्योग' करण्याचे धाडस भविष्यात कोणाला होणार नाही. जम्मू-काश्मीरच्या गृहखात्याने भारतविरोधी लेखन करणार्या लेखिका अरुंधती रॉय यांच्या एका पुस्तकासह एकूण २५ पुस्तकांवर बंदी घातली आहे. चुकीचे कथन करणारा मजकूर आणि फुटीरतावादास खतपाणी घालणारी ही पुस्तके असल्याचे सांगून या २५ पुस्तकांवर जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात बंदी घालण्यात आली. भारतीय न्याय संहितेच्या 'कलम ९८'अंतर्गत या पुस्तकांच्या सर्व प्रती जप्त करण्याचे आदेश जम्मू-काश्मीर सरकारने दिले आहेत. ऐतिहासिक किंवा राजकीय विश्लेषणाच्या नावाखाली या पुस्तकांच्या माध्यमातून चुकीचे कथन आणि फुटीरतावाद पसरविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची ठोस माहिती सरकारच्या हाती लागल्यानंतर त्यावर बंदी घालण्याचा आदेश सरकारने दिला. स्थानिक युवकांना अधिकाधिक कट्टर बनविण्यासाठी आणि त्या तरुणांना दहशतवादाकडे प्रवृत्त करणारे कथन त्या पुस्तकांमध्ये असल्याचे सरकारच्या लक्षात आल्याने ही बंदी घालण्यात आली. बंदी घालण्यात आलेल्या पुस्तकांमध्ये अरुंधती रॉय यांच्या 'आझादी'या पुस्तकाचा समावेश आहे. तसेच, डावे विचारवंत, धर्मांध मुस्लीम नेते आणि अन्य काही विदेशी लेखकांचा अंतर्भाव आहे. ए. जी. नुरानी, सुमंत्र बोस, डेव्हिड देवदास, अनुराधा भसीन यांनी काश्मीरसंदर्भात लिहिलेल्या पुस्तकांचा यामध्ये समावेश आहे. काही विदेशी लेखकांनी लिहिलेल्या काश्मीरसंदभार्तील पुस्तकांवरही बंदी घालण्यात आली आहे. कॅनडामध्ये खलिस्तान समर्थक उजळ माथ्याने आपल्या कारवाया करीत असल्याचे वारंवार आढळून येत आहे. अमेरिकाही अशा फुटीर खलिस्तानी नेत्यांविरुद्ध ठोस कारवाया करताना दिसत नाही. ब्रिटनमध्ये खलिस्तानी विचारांचे समर्थक अधूनमधून डोके वर काढत असतात. ब्रिटनमधील एका गुरुद्वारावर काही काळापूर्वी एक खलिस्तानी फलक लावण्यात आला. पण, त्यास ब्रिटन सरकारकडून आक्षेप घेण्यात आला नाही. उलट ब्रिटन सरकारची धमार्दाय संस्थांवर लक्ष ठेवणारी जी संस्था आहे, त्या संस्थेस 'खलिस्तान' फलक लावण्यात आक्षेपार्ह असे काहीच दिसून आले नाही. ब्रिटनमधील स्लॉग येथे गुरुद्वारा श्री गुरुसिंह सभा येथे 'खलिस्तान' फलक लावण्यात आला आहे. असा फलक लावण्यात काहीच आक्षेप घेण्यासारखे नाही, असे ब्रिटनच्या धमार्दाय संस्थांवर लक्ष ठेवणार्या संस्थेने म्हटले आहे. असा फलक लावून कोणत्याही राजकीय मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झालेले नाही, असेही त्या संस्थेने म्हटले आहे. भारताने अशा घटनेसंदर्भात चिंता व्यक्त केली असताना ब्रिटनच्या धमार्दाय आयोगास राजकीय मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाले आहे, असे वाटत नाही!

# भाषेच्या आग्रहापलीकडे...



भाषेच्या आग्रहापलीकडे...

दक्षिणेतल्या कर्नाटक आणि तामिळनाडू या दोन्ही राज्यांनी आपलं म्हणणं खरं करून दाखवलंच. राज्याच्या शैक्षणिक धोरणात त्यांनी त्रिभाषा सूत्र उडवून लावलं असून द्विभाषा सूत्रावरच शिक्कामोर्तब केलं आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केलं, तेव्हाच त्यातील हिंदीच्या समावेशाला तामिळनाडू सरकारने विरोध केला होता. कर्नाटकातल्या सरकारने असा विरोध केला नव्हता. तिथल्या तेव्हांच्या सरकारने केंद्रातल्या शैक्षणिक धोरणाला पाठिंबाच दर्शवला होता. पण, नंतर आलेल्या काँग्रेस सरकारने मात्र केंद्रातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं शैक्षणिक धोरण बाजूला सारून द्विभाषिक धोरणाचाच अंगीकार करायचं नक्की केलं आहे. कर्नाटकात कन्नड आणि तामिळनाडूत तमिळ ही त्यांची पहिली भाषा असेल. इंग्रजीला दुसरं स्थान देण्यात आलं असून राष्ट्राची संपर्क भाषा म्हणून हिंदीला नाकारण्यात आलं आहे. दक्षिणेतल्या राज्यांचा द्रविड संस्कृतीचा आणि आपल्या स्थानिक भाषांबाबतचा आग्रह अनेक वर्षांनंतर अजूनही कायम असल्याचं या दोन्ही राज्यांनी याद्वारे दाखवून दिलं आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीला स्वीकारायला महाराष्ट्रातही विरोध झाला. पण, तो मुख्यतः 'पहिलीपासून सक्ती'ला होता. भाषा शिकण्याला किंवा शिकवण्याला नव्हता. आजही महाराष्ट्रात पाचवीपासून हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवली जातेच. त्याला कुणाचा विरोध नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र आहे. पण, पहिलीपासून नाही; पाचवीपासून आहे. त्याची अंमलबजावणी तर महाराष्ट्रात आधीपासूनच सर्वत्र सुरू आहे. भाषिक अल्पसंख्याकांच्या शिक्षण संस्थांमध्ये पहिली भाषा ही त्यांची मातृभाषा, दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी भाषा ते ज्या राज्यात असतील, त्या राज्याची राज्यभाषा (महाराष्ट्रात मराठी) अशा पद्धतीचं त्रिभाषा सूत्र आहे. अगदी तामिळनाडू आणि कर्नाटकातही हेच आहे. उत्तर भारतातल्या वर्चस्वाला विरोध म्हणून त्या राज्यात पूर्वीपासून हिंदीला विरोध असला, तरी त्याची धगही आता केवळ राजकीय पातळीवर आहे. तीही योग्यवेळी राजकारणाच्या सोयीसाठी फुलवली जाते म्हणून. दक्षिणेच्या राज्यात पूर्वी कोणी अन्य भाषिक गेला, तर संपकार्चा अवघड प्रश्न निर्माण होत असे. संपर्क भाषा म्हणून सर्रास वापरल्या जाणाऱ्या हिंदीचा वापर तिथे स्थानिक कटाक्षाने टाळत असत. पण, वाढत्या संपर्क साधनांमुळे आणि माध्यम क्रांतीमुळे ही परिस्थितीही बदलली आहे. कर्नाटकपासून केरळपर्यंत सर्वच राज्यातून लोक रोजगारासाठी बाहेर पडले आहेत. देशात - परदेशात गेलेल्या या स्थलांतरितांना संपर्क भाषेचा आसरा घ्यावा लागतोच. त्याशिवाय संवाद साधणार कसा आणि रोजगार मिळवणार कसा? मुंबईत आलेला दक्षिण भारतीय असो, की आखातात पोहोचलेला - तो हिंदीशी वैर करत नाही, करू शकत नाही. हा संदेश आता त्या राज्यातही पोहोचला आहे. तिथेही सोयीनुसार संपर्क भाषा म्हणून हिंदीचा स्वीकार केव्हांच झाला आहे. दक्षिणेतली राज्यं शिक्षण प्रसारात, शिक्षणाच्या गुणवत्तेत आघाडीवर आहेत. त्याचा फायदा तिथल्या जनतेला मोठ्या प्रमाणावर होतच असतो. इंग्रजीला पसंती आणि प्राधान्य दिल्यामुळे दक्षिणेतल्या विद्यार्थ्यांना आधुनिक विद्याशाखांमध्ये सहज प्रवेश घेता येतो. प्रावीण्यही मिळवता येतं. जे शिक्षणाच्या प्रवाहातून फेकले जातात, त्यांचाच प्रश्न असतो. त्यांची हिंदी या संपर्क भाषेअभावी सुरुवातीला चांगलीच कुचंबणा होते. ही व्यावहारिक अडचण तिथल्या जनतेला कळते, तशी राजकारण्यांनाही कळते. पण, भाषा हा तिथल्या राजकारणात अस्मितेचा महत्त्वाचा मुद्दा असल्याने त्यांचाही नाईलाज होतो! महाराष्ट्राची विचार करण्याची पद्धत वेगळी आहे. 'महाराष्ट्र' या शब्दातच 'राष्ट्र' असल्याने महाराष्ट्र नेहमीच राष्ट्राचा व्यापक विचार करतो. स्वातंत्र्य चळवळीचं केंद्र महाराष्ट्रच होतं. त्यामुळे, महाराष्ट्राची मानसिकता नेहमी राष्ट्रीय राहिली आहे. अस्मितांच्या हिंदोळ्यांपेक्षा महाराष्ट्राच्या राजकारणाची ओळख 'विचारावर चालणारं', 'विकासात्मक दृष्टिकोन असलेलं', 'प्रगतिशील' अशी होती. ती आता बदलू लागली आहे, हा भाग वेगळा. पण, तरीही दक्षिणेतल्या राज्यातलं शिक्षणाला असलेलं महत्त्व, त्याकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी महाराष्ट्राने पुन्हा अंगीकारण्याची गरज आहे. तामिळनाडूने त्यांच्या २०२५-२६च्या अर्थसंकल्पात शालेय शिक्षणासाठी ४४ हजार ४२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या १३.७ टक्के एवढी ही तरतूद आहे. देशात सर्वाधिक! शालेय विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजनाची अभिनव कल्पना राबवणाऱ्या या राज्याने आता मुलांना शाळेत न्याहारीही सुरू केली आहे. झोपडपट्टी किंवा अगदी दुर्गम, दुष्काळी भागात काम करणाऱ्या शिक्षकांना या दोन्हींचं महत्त्व पटकन कळेल. विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीवर याचा किती सकारात्मक परिणाम होत असेल, तेही हे शिक्षक सांगतील. ढोबळ यश सांगायचं, तर मध्यान्ह भोजनाबरोबर न्याहारी सुरू केल्याने मुलांचं शाळेत दाखल होण्याचं तिथलं प्रमाण ९५ टक्क्यांवर गेलं आहे. गळतीचं प्रमाण अवघं तीन टक्के आहे. प्रत्येक शाळेत विज्ञानाची प्रयोगशाळा, डिजिटल वर्गांबरोबरच त्यांनी विद्यार्थ्यांची तार्किक विचारक्षमता वाढवण्यासाठी अभ्यासक्रमात केलेले बदल अत्यंत महत्त्वाचे आहेत. वातावरणीय बदल, सामाजिक न्यायासारख्या विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केला आहे. स्वभाषेचा आग्रह कोणीही धरावाच. मुलांचं प्राथमिक शिक्षणही प्रायः त्या भाषेतूनच व्हावं. पण, त्या भाषेतून जे शिक्षण दिलं जाईल, त्याविषयीही समाजधुरिणांनी आग्रही असायला हवं. भाषेबरोबरच तामिळनाडूसारखं आशयाबद्दल आग्रही राहिलं नाही, तर तो गाफिलपणा पुढच्या किती पिढ्यांना भोगायला लागेल कुणास ठाऊक!

# हनी ट्रॅपपासून वेळीच सावध व्हा!



आजकाल आपण हनी ट्रॅपबद्दलच्या बातम्या, घटना त्यातून वाढत चाललेली गुन्हेगारी वृत्ती, बदनामीच्या भीतीने घडणाऱ्या आत्महत्या याबद्दल रोज ऐकतो, वाचतो. या लेखात आपण हनी ट्रॅपबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत. हनी ट्रॅप म्हणजे एखाद्या आकर्षक किंवा मोहक व्यक्तीचा वापर करून दुसऱ्या व्यक्तीला जाळ्यात अडकवणं, शक्यतो अडकवणारी व्यक्ती ही महिला असते. हा ज्याला अडकवायचं त्याच्यासाठी एक प्रकारचा मानसिक आणि भावनिक सापळा आहे. यात खोटं प्रेम, आकर्षण, जवळीक, आपुलकी किंवा शारीरिक संबंधांचे आमिष दाखवून समोरच्या व्यक्तीकडून पैसे, मालमत्ता, गोपनीय माहिती किंवा इतर वैयक्तिक फायद्याच्या गोष्टी मिळवल्या जातात. पूर्वी गुप्तहेर संस्थांकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी याचा वापर केला जायचा. सोशल मीडियाच्या युगात याचे स्वरूप बदलले आहे आणि आता सर्वसामान्य व्यक्तीही यात अडकू शकतात. हनी ट्रॅप वेगवेगळ्या कारणांसाठी केला जातो, त्यापैकी काही प्रमुख कारणे म्हणजे ब्लॅकमेलिंग, समोरच्या व्यक्तीला त्यांच्या खासगी क्षणांचे, फोटो किंवा व्हिडीओ मिळवून अथवा तो सोबत असताना शारीरिक संबंध करतानाचे फोटो, व्हिडीओ काढून त्यालाच नंतर ब्लॅकमेल करणे, त्याला व्हिडीओ कॉलमार्फत नको त्या गोष्टी करायला सांगून त्याचे रेकॉर्डिंग करून घेणे आणि नंतर त्याला त्रास देणे असे विविध प्रकार हनी ट्रॅप करणारी व्यक्ती वापरत असते. आर्थिक फायदा हा यातील महत्त्वाचा भाग आहे. मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींकडून पैसे, मालमत्ता किंवा इतर आर्थिक फायदे मिळवण्यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. एकदा समोरचा ब्लॅकमेलिंग, सामाजिक बदनामी, नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी हे समजलं तर नोकरी जाईल, व्यवसायावर परिणाम होईल, समाजात बाहेर कुठे हे फोटो व्हिडीओ व्हायरल झाले तर काय होईल याला घाबरून जातो. अशा तणावात्मक परिस्थितीत असलेल्या व्यक्तीला वारंवार धाक दाखवून मोठ्या रकमेची मागणी केली जाते. एखाद्या व्यक्तीकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी जसे की सरकारी अधिकारी, शास्त्रज्ञ किंवा उच्च पदावरील व्यक्तींकडून देशाच्या सुरक्षेशी संबंधित किंवा इतर गोपनीय माहिती मिळवणे, कार्यालयीन माहिती, राजकीय डावपेच, मोठे व्यवहार, महत्त्वाचे निर्णय याबद्दल माहिती काढणे हनी ट्रॅपद्वारे सहज शक्य होते. राजकीय हेतू हनी ट्रॅपमध्ये अनेकदा पाहायला मिळतो. राजकीय विरोधकांना बदनाम करणे किंवा त्यांच्याकडून चुकीचे निर्णय घ्यायला लावून राजकीय फायदा मिळवणे, महत्त्वाचा राजकीय निर्णय अथवा घडामोडीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी, राजकीय भूमिका बदलण्यासाठी, नेते अथवा पक्ष फोडीसाठी सुद्धा हनी ट्रॅप वापरला जातो. राजकीय पद मिळवणे, राजकारणात पुढे जाणे, उच्चपदस्त नेते मंडळीशी जवळीक साधणे, त्यांच्याकडून कामे करून घेणे यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. आपल्या कामाचे क्षेत्र कोणतेही असो आपण हनी ट्रॅपमध्ये अडकणार नाही. यासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे. अगदी तरुण मुलं-मुली, वयोवृद्ध सुद्धा अशा सापळ्यात अडकत असतात. त्यामुळे आपलं वय कितीही असले तरी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

हनी ट्रॅपमध्ये पुरुष कसे अडकतात यावर अभ्यास केला असता काही मुद्दे प्रकर्षाने लक्षात येतात. मुख्य म्हणजे आजकाल प्रत्येकजण समाज माध्यमातून, मोबाईल, लॅपटॉपवरून विविध ॲप्लिकेशन, साईट्स हे नियमित वापरत असतात, अनेक नोटिफिकेशन आपल्याला येत असतात, अनेकदा विविध मेसेज, लिंक्स तपासून न घेता त्या उघडून पाहण्याची इच्छा होईल अशा प्रकारे तयार केलेल्या असतात. अशाच वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून सोशल मीडियावर पुरुषांशी ओळख करून ती वाढवली जाते. फेसबुक, इन्स्टाग्राम, डेटिंग एप्स किंवा इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आकर्षक प्रोफाइलच्या माध्यमातून ओळख केली जाते. जवळीक झाल्यावर, समोरील व्यक्तीने आपला विश्वास संपादन केला आहे. हे लक्षात आल्यावर या सोशल मीडियावरील एकमेकांशी केलेल्या चॅटिंगचा, शेअर केलेले फोटो, व्हिडीओ आणि माहितीचा वापर करून समोरील व्यक्तीवर दबाव आणला जातो. जेव्हा कोणत्याही पुरुषाने भावनेच्या भरात काही आक्षेप हाय चॅटिंग केलेले असेल, मागणी केली असेल त्याला सावज बनवले जाते. भावनिक नातं तयार करून ही व्यक्ती हळूहळू तुमच्याशी गोड बोलून जवळचं नातं निर्माण करते आणि तुमचा विश्वास जिंकते. त्यानंतर खासगी माहितीची देवाणघेवाण सुरू होते. जसे की समोरील व्यक्ती तुमच्याकडून तुमच्या खासगी आयुष्याबद्दलची माहिती घेते. तुमचे वीकपॉइंट, सुखं, दुःखं, सवयी ओळखून तुमच्याशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न करते. अगदी आपल्या कुटुंबाबद्दल, घर, नोकरी, उद्योग दैनंदिन रुटीन याबद्दल पण माहिती काढून घेतली जाते. अत्यंत संवेदनशील मुद्दा हनी ट्रॅपमध्ये अडकण्यासाठी कारणीभूत ठरतो. अनेकदा एखादी व्यक्ती व्हिडीओ कॉलवर अश्लील संभाषण किंवा कृती करण्याची मागणी करते. या क्षणांचे रेकॉर्डिंग करून ठेवले जाते त्यानंतर ब्लॅकमेलिंग सुरू होते. तुमच्याकडून पैशाची मागणी केली जाते किंवा काही गोपनीय महत्त्वाची माहिती द्यायला सांगितले जाते अथवा कोणतेही कामं जे जोखमीचे असेल ते तुमच्याकडून जबरदस्तीने करून घेतले जाते. हनी ट्रॅपपासून वाचण्यासाठी काय करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

या सापळ्यात अडकण्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता. सामाजिक माध्यम वापरताना अनोळखी व्यक्तींशी सावधगिरी बाळगा. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सतर्क राहा, कोणतीही खोटी प्रोफाइल, खोटी माहिती खोटा फोटो टाकून बनवली आहे की खरंच अशी व्यक्ती अस्तित्वात आहे, कुठे आहे, काय करते याचा शहानिशा करा. कुठल्याही अस्तित्वात नसलेल्या, संबंध नसलेल्या सुंदर मुलींचे, महिलांचे इंटरनेटवरून फोटो वापरून, त्याला खोटं नावं वापरून विविध ॲप्लिकेशनवर टाकलेले असतात. त्या प्रोफाइलला हाताळणारे भलतेच लोकं असतात जे तुम्हाला हनी ट्रॅप करण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करत असतात. त्यामुळे कितीही मोह झाला, आकर्षण वाटले तरी आपली सदसदविवेकबुद्धी जागृत ठेऊनच सोशल मीडिया हाताळणे उचित आहे. कोणालाही आपली वैयक्तिक माहिती देऊ नका, कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत तुमच्या खासगी आयुष्याबद्दल, आर्थिक परिस्थितीबद्दलची माहिती शेअर करू नका. अनोळखी व्यक्तींसोबत व्हिडीओ कॉलवर खासगी किंवा अश्लील संभाषण टाळा. अशा परिस्थितीत कोणतीही आक्षेपार्ह गोष्ट करू नका, पैशाची मागणी करणाऱ्यांपासून दूर राहा. जर कोणी तुमच्याकडे अचानक पैसे किंवा इतर मदतीची मागणी करत असेल, त्याचा हेतू योग्य वाटतं नसेल, तर लगेच सावध व्हा. अशा प्रकरणात पोलिसांची मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्हाला कोणी ब्लॅकमेल करत असेल तर घाबरू नका. लगेच पोलिसांना याची माहिती द्या, कायद्याची मदत घ्या. जर तुम्हाला हनी ट्रॅपच्या कोणत्याही परिस्थितीत अडकल्याचा संशय आल्यास, कारवाई करण्यासाठी कुटुंबातील सदस्य, मित्र, नातेवाईक यांची मदत घ्या, त्यांना विश्वासात घ्या, स्वतःची चूक मान्य करा, घाबरून, गडबडीत चुकीचा निर्णय घेणे टाळा. अशावेळी तुम्ही पोलिसांना किंवा सायबर सेलला संपर्क करू शकता.

# काय खावे आणि काय खाऊ नये हा एकच प्रश्न!

15 ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्य दिवस. इंग्रजांच्या गुलामीतून मुक्तीचा दिवस. हजारो, लाखो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानानंतर स्वातंत्र्याचा सूर्य उगवला. हा दिवस हर्षोल्हासात, उत्साहाने सर्वसामान्य भारतीय नागरिक सणासारखा साजरा करतात. या दिवशी अनेकांच्या घरांमध्ये गोडधोड पदार्थ केले जातात. शाळा, महाविद्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये पेढे, जिलेबीचं वाटप होतं. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन हे आपले राष्ट्रीय सण अशाच पद्धतीने महाराष्ट्रात आणि देशातही साजरे होतात. यामध्ये कधीही जात, धर्म, पंथ काहीही येत नाही. सर्व भेद विसरून भारतीय म्हणून या राष्ट्रीय सणांना सर्व एकत्र येतात. मात्र यंदाच्या स्वातंत्र्यदिनाचा बेत शाकाहारी असेल की मांसाहारी असा प्रश्न निर्माण करणारा निर्णय कल्याण-डोंबिवलीसह काही महापालिकांनी घेतला. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या बाजार व परवाना विभागाने 4 ऑगस्ट 2026 (2026 प्रिंट मिस्टेक असल्याचा दावा मनपाने केला आहे.) रोजी 19 डिसेंबर 1988च्या प्रशासकीय ठरावानुसार जाहीर सूचना प्रसिद्ध करून मनपा क्षेत्रात 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त जनावरांचे लहान-मोठे कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. या जाहीर सूचनेची साथ शेकडो किलोमीटर दूर असलेल्या नागपूर महापालिकेपर्यंत पोहोचली. त्यानंतर मालेगाव, संभाजीनगर महापालिकेनेही स्वातंत्र्य दिन शाकाहारानेच साजरा करण्याची जाहीर सूचना काढली आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावरच गदा आणणारा हा निर्णय आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. ज्या दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळाले, भारतीय नागरिकाला अभिव्यक्ती, भाषणाचे स्वातंत्र्य मिळाले, संपूर्ण देशात मुक्तपणे फिरण्याचे स्वातंत्र्य मिळाले, शांततापूर्ण मार्गाने एकत्र येण्याचे स्वातंत्र्य मिळाले, नागरिकांना त्यांचे जीवन सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला, त्याच दिवशी त्याला जर मांसाहार खाण्याची आवड असेल तर त्यावर निर्बंध लादण्याचा निर्णय कल्याणपासून नागपूर आणि मालेगाव महापालिकेने कोणासाठी आणि कोणाच्या आदेशाने घेतलाय? कोणी काय खावं, हा ज्याच्या त्याच्या घरातील आणि त्यातल्या त्यातही स्वयंपाकघरातील प्रश्न आहे. त्याला चारचौघात आणि चौकात, महापालिका कार्यक्षेत्रापर्यंत आणण्यामागाचा हेतू काय आहे, हे आता लोकांना कळणार नाही, असा जर धोरणकर्ते विचार करत असतील तर ते कोणत्या नंदनवनात आहेत, याचा त्यांनीच शोध घ्यावा. येत्या काळात महापालिका निवडणुका आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या महत्त्वाच्या पालिकांवर कोणाचा झेंडा फडकणार यासाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. त्यातूनच दुहीची बीजं पेरण्यासाठी हा निर्णय घेतला गेला का, अशी शंका घ्यायला वाव आहे. याआधीच्या निवडणुकांपूर्वी मराठा विरुद्ध ओबीसी, हिंदू विरुद्ध मुस्लीम हे झालं आहे. आता हिंदी विरुद्ध मराठी, शाकाहारी विरुद्ध मांसाहारी अशी फोडणी दिल्याचाच वास या निर्णयाला येत आहे. मुंबईत सध्या जी कबूतरबाजी सुरू आहे, ते दुसरं काय आहे? व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यावरच निर्बंध आणणारा हा निर्णय आहे. मात्र या निर्णयाला आधार दिला जात आहे 37-38 वर्षांपूर्वीच्या एका प्रशासकीय ठरावाचा. कल्याण महानगरपालिकेने 1988 साली एक प्रशासकीय ठराव केला. त्यानुसार इतर काही सण, उत्सव, जयंतीसोबत 15 ऑगस्टला कत्तलखाने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु तेव्हा तो निर्णय घेण्यामागे काय कारण होते, याची पडताळणी आजच्या बोरुबहाद्दरांनी केली आहे का? तेव्हा तत्कालीन वैद्यकीय अधिकार्यांनी एक अहवाल मनपा प्रशासकांना दिला, त्यानुसार प्रशासकाने निर्णय घेतला होता. त्या निर्णयाची आजच्या काळात व्यावहारिकता किती आहे? आता कोणताही सण, उत्सव आला की सर्वात पहिली कुऱ्हाड ही मांसाहार बंदीवर पडत आहे. पर्यूषण काळात मांसाहार बंद राहिला पाहिजे, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून सालाबादाप्रमाणे होत आहे. त्याची अजून सर्रास अंमलबजावणी होत नसली तरी मागणी नित्यनियमाने दरवर्षी होत आहे. उत्तर भारतात कावड यात्रेच्या मार्गात मांसाहाराची दुकाने बंद ठेवली पाहिजे हीदेखील त्यापैकीच एक मागणी. नाशिकमध्ये येत्या काळात कुंभमेळा आहे, त्या मार्गावरील चिकन-मटणची दुकाने बंद ठेवण्याची मागणी पुढे येत आहे.

PREGNANCY CARE



# बाळाचा बबल बाथ

बाळाच्या आरोग्यासाठी मालिश करणे आणि अंघोळ घालणे या गरजेच्या गोष्टी आहेत. या दोन्ही गोष्टींमुळे बाळाच्या शरीराची वाढ योग्यरित्या होण्यास मदत होते. पण, लहान मुलांना अंघोळ घालणे हे कित्येक आई-वडिलांसाठी मोठी कसरत असू शकते. पूर्वी घरातील आजी पणजी लहान मुलांना मालिश करून अंघोळ घालत असे. पण, आता यासाठी आया ठेवल्या जातात. हे ठेवणे शक्य नसेल तर सरळ बबल बाथ हा पर्याय निवडला जात आहे. बबल बाथ हे सोपा उपाय असला तरी लहान मुलांच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो.

बबल बाथ म्हणजे काय?

बबल बाथ म्हणजे पाण्याला फेसयुक्त, सुगंधित आणि रंग देऊन मुलांसाठी मजेशीर बनवले जाते.

आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी हानिकारक - बबल बाथमधील पाण्याला फेसयुक्त, सुगंधित आणि रंग दिल्याने मुलांच्या आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी हे वाईट परिणाम देणारे ठरू शकते.

लहान मुलांची त्वचा संवेदनशील असल्याने पाण्यातील केमिकल आणि कृत्रिम सुगंधामुळे त्वचेवर लालसर चट्टे येऊ शकतात.

फेसाळयुक्त पाण्यामुळे डोळ्यांचे आरोग्य खराब होऊ शकते. या पाण्यामुळे डोळे लाल होणे, चुरचुरणे अशा समस्या उद्भवतात.

त्वचेचा ढळ बदलू शकतो. ज्यामुळे त्वचा रुक्ष होऊन खाज येऊ शकते.

बबल बाथमधील फेसाळयुक्त पाण्यामुळे युटीआयच्या समस्या निर्माण होऊ शकतात. यामुळे प्रायव्हेट पार्टमध्ये खाज येणे सुरू होते.

या उपायांनी इन्फेक्शपासून मुलांना दूर ठेवता येईल -

पाण्यात गुलाबाच्या पाकळ्या किंवा दूध तुम्ही मिक्स करू शकता.

खोबऱ्याचे तेल किंवा एलोवेरा जेल मिक्स करता येईल.

हे ही महत्त्वाचे -



मुलांसाठी असणारे ऍलर्जी- फ्री आणि ढळ संतुलित बबल बाथ वापरावा.

जास्त वेळ मुलांना ठेवू नये.

अंघोळ झाल्यावर त्वचेला मॉइश्चरायजर वापरावे.

# नॉर्मल डिलिव्हरी व्हावी अशी इच्छा असेल तर आवर्जून करावीत ही ५ योगासनं

सी सेक्शन प्रक्रियेसाठी सहसा कोणी डॉक्टर सल्ला देत नाहीत. अगदीच गुंतागुंतीची परिस्थिती उद्भवली, आईची तब्येत आणि वय असे अनेक मुद्दे निगडित असतात, तेव्हाच सिझेरियनचा सल्ला दिला जातो. मात्र एरवी नॉर्मल डिलिव्हरी व्हावी असाच प्रसूती तज्ज्ञांचा प्रयत्न असतो. मात्र ही कठीण गोष्ट सोपी करण्यासाठी मानसिक आणि शारीरिक तयारीही आवश्यक आहे. तुम्हीही गर्भवती असाल आणि नॉर्मल डिलिव्हरी व्हावी अशी इच्छा असेल तर डॉक्टरांनी सुचवलेल्या या ५ योगासनांचा सराव नवव्या महिन्यापासून सुरू करावा. ही आसने केल्याने होणारा फायदा आणि ती कशी करावीत हे आपण स्त्रीरोग आणि प्रसूतीतज्ज्ञ डॉ. ममता त्यागी यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओच्या माध्यमातून पाहू या.

मालासन

मालासनामुळे कंबर मोकळी होते, पाठीच्या खालच्या भागात आणि पेल्विक फ्लोअरमध्ये ताण कमी होतो आणि पचन सुधारते. हे आसन करण्यासाठी, तुम्ही तुमच्या कंबरेखाली योगा ब्लॉक वापरू शकता किंवा योगा ब्लॉकशिवाय करू शकता.

स्कंदासन

स्कंदासन, याला स्टँडिंग साईड लंज असेही म्हणतात, गर्भधारणेदरम्यान एक फायदेशीर योगासन ठरू शकते. हे आसन आतील मांड्या उघडण्यास आणि ताणण्यास मदत करू शकते, जे गर्भधारणेदरम्यान पेल्विक फ्लोरच्या आरोग्यासाठी आणि लवचिकतेसाठी महत्वाचे आहे.

मार्जरासन

पोटाचे स्नायू हळूवारपणे ताणले जातात आणि हृदय उघडते. हे आसन पोटाच्या स्नायूंना बळकट करण्यास मदत करते, जे वाढत्या गर्भाशयाला आधार देण्यासाठी फायदेशीर ठरू शकते. हे आसन प्रसूतीवेदना कमी करण्यास आणि प्रसूतीसाठी तयार होण्यास मदत करते.

बद्धकोनासन

या आसनामुळे कंबर आणि कंबरेचे सांधे उघडण्यास मदत होते. हे केल्याने पेल्विक फ्लोर स्नायूंना बळकटी मिळते आणि शरीर प्रसूतीसाठी तयार होते.

अर्धसेतूबंधासन

हे आसन पेल्विक फ्लोर स्नायूंना सक्रियपणे बळकट करते, जे वाढत्या गर्भाशयाला आधार देतात. हे पेल्विक फ्लोर उघडण्यास देखील मदत करते, ज्यामुळे सामान्य प्रसूती सुलभ होते.



# अंगभर आलेल्या सूजेने गरोदरपणाचा आनंद हरवतोय?



गर्भवती महिलेला गरोदरपणाच्या प्रत्येक तिमाहीत वेगवेगळ्या आव्हानांना सामोरं जावं लागतं. यातच शरीरावर सूज येऊन सगळं अंग भप्प झाल्यासारखं दिसणं हीसुद्धा सामान्य बाब आहे. जसजसे दिवस पुढे जातात तसतशी चेहरा, हातपाय अशा ठिकाणी सूज वाढू लागते. आधी म्हटल्याप्रमाणे ही तशी सामान्य बाब आहे तरीही ही सूज कधीकधी गरोदरपणाच्या या प्रवासात अडचण ठरू शकते. आज आपण प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. चेतना जैन यांच्याकडून समजून घेऊ या की ही अशी सूज कोणत्या कारणांमुळे येते आणि त्यावरील उपाय काय आहेत?

वजनवाढ

डॉक्टर चेतना यांच्या मते, गर्भवती महिलांच्या शरीरात सूज येण्याचे मुख्य कारण त्यांचे वजन वाढणे आहे. गर्भधारणेच्या चौथ्या महिन्यापासून नवव्या महिन्यापर्यंत महिलांचे वजन झपाट्याने वाढते.

व्यायामाचा अभाव

गर्भवती स्त्री जर व्यायाम करत नसेल, तर पायांमधून परत येणारे रक्त शरीरात पोहोचण्यास अडचण येते. अशा परिस्थितीत, रक्त पायांमध्ये जमा होते आणि त्वचेच्या मागे जाते. यामुळे, गर्भवती महिलेला तिच्या पायांमध्ये सूज येते.

रक्ताची कमतरता

याशिवाय गर्भवती महिलेच्या शरीरात रक्ताची कमतरता देखील सूज निर्माण करते. जर तुम्हाला लक्षात आले तर सुरुवातीला हिमोग्लोबिनचे प्रमाण चांगले असते, परंतु तीन ते चार महिन्यांनंतर हिमोग्लोबिन कमी होऊ लागते.

प्रथिनांची कमतरता

हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे शरीरात जळजळ होते. याशिवाय प्रथिनांची कमतरता हे देखील एक कारण आहे. डॉक्टर म्हणतात की शाकाहारी लोकांच्या शरीरात प्रथिनांची कमतरता अनेकदा आढळते. विशेषतः गरोदरपणात, जर होणारी आई जास्त प्रथिने घेऊ शकत नसेल, तर शरीरावर सूज येऊ शकते. एखाद्या गर्भवती महिलेला आधीच हृदय किंवा मूत्रपिंडाचा आजार असेल, तर या महिलांना इतरांपेक्षा जास्त सूज येते. डॉक्टरांच्या मते, जर तुमच्या शरीरात हात आणि पाय वगळता इतरत्र कुठेही सूज नसेल, तर तुम्ही काळजी करू नये.

उपाय काय आहेत

अ. जेव्हा जेव्हा तुम्हाला तुमच्या शरीरात सूज जाणवते तेव्हा तुम्ही ताबडतोब तुमचा रक्तदाब तपासला पाहिजे.

ब. गरोदरपणात मिठाचे सेवन कमीत कमी करा.

क. जर तुम्ही टेबलावर काम करत असाल तर तुमचे पाय लटकवण्याऐवजी पायाच्या स्टूलवर ठेवा.

ड. सूज कमी करण्यासाठी कॉम्प्रेशन मोजे खूप फायदेशीर आहेत. ते नियमितपणे घालल्याने पायांची सूज कमी होते.

इ. रात्री झोपताना पाय उंच ठेवा. यामुळे पायांमधील सर्व पाणी शरीरातून त्वरित काढून टाकले जाईल.

# 'मुहूर्त पाहून डिलिव्हरी' हा ट्रेंड का वाढतोय भारतात?

मुहुर्तावर डिलिव्हरी व्हावी अशी इच्छा असणा[illegible]या भावी पालकांची संख्या वाढताना दिसते आहे. भारतात ही गोष्ट लक्षात आली ती अयोध्येत राममंदिराच्या उद्घाटन सोहळ्याच्या वेळी. अनेक गर्भवती स्त्रियांना तेव्हा इच्छा होती की त्यांची डिलिव्हरी राममंदिराच्या प्राण प्रतिष्ठापनेच्या मुहूर्तावर व्हावी. त्यांनी तशी मागणी त्यांच्या डॉक्टरांकडे नोंदवली होती. हे का घडलं आणि याचे परिणाम काय होतात हे आपण समजून घेऊ या.

मुहूर्त डिलिव्हरी म्हणजे काय - ही एकदाच घडलेली घटना नव्हती पण मुहूर्त प्रसूती किंवा शुभ मुहूर्तावर बाळंतपणाचा ट्रेंड संपूर्ण भारतात वाढत आहे. पण रुग्णालये आणि डॉक्टरांना अशा विनंत्या का येत आहेत?

सेवा यादीत मुहूर्त प्रसूतीचा समावेश - काही क्लिनिक तर त्यांच्या सेवा यादीत 'मुहूर्त प्रसूती'चा समावेश करण्यापर्यंत पोहोचले आहेत. भारतात मुहूर्त प्रसूतीची क्रेझ आता सर्वोच्च पातळीवर आहे का, जर हो, तर त्याचे कारण काय आहे?

गर्भवती महिलेचे वय योग्य - बेंगळुरू येथील ग्लेनेगल्स बीजीएस हॉस्पिटलमधील प्रसूती आणि स्त्रीरोगशास्त्राच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. निर्मला चंद्रशेखर स्पष्ट करतात की, मुहूर्त प्रसूती म्हणजे अशी पद्धत ज्यामध्ये पालक त्यांच्या बाळाच्या जन्मासाठी एक विशिष्ट दिवस आणि वेळ निवडतात. बऱ्याचदा तारीख आणि वेळ पुजारी किंवा ज्योतिषीशी सल्लामसलत केल्यानंतर ठरवली जाते. तथापि, डॉक्टर गर्भवती महिलेचे वय योग्य आहे आणि तिला कोणतीही वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती नाही याची खात्री करतात.

सी-सेंक्शनवर अवलंबून - डॉक्टरांच्या मते, ही काही नवीन गोष्ट नाही आणि पयार्यी सी-सेक्शनवरील वाढत्या अवलंबित्वामुळे ती अधिक प्रचलित झाली आहे. ती पुढे म्हणते की अनेक पहिल्यांदाच येणाऱ्या माता आगाऊ नियोजन केल्यानंतर सी-सेक्शनचा पर्याय निवडतात.अशा परिस्थितीत, प्रसूतीसाठी योग्य वेळ ठरवणे त्यांना अधिक तर्कसंगत वाटते.

तारीख आणि वेळ निवड - बाळंतपणा पूर्णपणे नियंत्रित करता येत नाही आणि पारंपारिकपणे बहुतेक बाळंतपण नैसर्गिकरित्या होतात, म्हणून तारीख निश्चित करणे हा बाळाचा जन्म कधी होईल याचा अंदाजे अंदाज होता. तथापि, आता वैद्यकीय सुविधा प्रगत झाल्या आहेत, त्यामुळे अनेक पालकांचा असा विश्वास आहे की ज्योतिषशास्त्रानुसार तारीख आणि वेळ निवडून ते त्यांच्या मुलाच्या भवितव्यावर प्रभाव टाकू शकतात.

# गहू अन् मैदापेक्षा बाजरीची बिस्किटं आहेत पौष्टिक

वाढत्या जागतिकीकरणाच्या युगात, पालक आपल्या मुलांच्या आहाराबाबत अधिक जागरूक झाले आहेत. मुलांना चविष्ट आणि आकर्षक पदार्थ आवडतात, पण त्याचवेळी ते आरोग्यदायी असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. आज बाजारात गहू आणि मैद्यापासून तयार केलेली अनेक बिस्किटं उपलब्ध आहेत, पण त्यात फॅट्स, शर्करा आणि उच्च ग्लायसेमिक इंडेक्समुळे आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.



गहू व मैदा बिस्किटांचे तोटे

फॅट्स व वजन वाढवणारे घटक - मैदा आणि गव्हाचे पीठ अधिक प्रक्रिया केलेले असल्यामुळे त्यात कॅलरीज आणि फॅट्स जास्त असतात, ज्यामुळे लहान वयातच अति वजनाचा धोका होतो.

पचनावर परिणाम - हे पदार्थ पचायला जड असतात, ज्यामुळे मुलांना अपचन, गॅस किंवा पोटदुखी होऊ शकते.

शर्करेची अनियमित वाढ - उच्च ग्लायसेमिक इंडेक्समुळे साखरेची पातळी झपाट्याने वाढते, ज्यामुळे दीर्घकालीन आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात.

बाजरी - एक पौष्टिक आणि सुरक्षित पर्याय

बाजरी हे एक अत्यंत पोषणमूल्य असलेले धान्य आहे. प्राचीन काळापासून ते भारतीय आहाराचा भाग आहे.

फायबर्सने समृद्ध - बाजरीत भरपूर फायबर्स असल्याने पचनक्रिया सुरळीत राहते.

भूक नियंत्रित करते - प्रोटिन आणि फायबर्समुळे पोट भरल्यासारखं वाटतं, जे जंक फूडच्या सेवनापासून वाचवते.

कॅल्शियम आणि आयर्नचा उत्तम स्त्रोत - हाडं बळकट होण्यासाठी आणि हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी उपयुक्त.

चवीसाठीही उत्तम - मुलांना न आवडणारी भाकरी किंवा चपाती बाजरीच्या बिस्किटांच्या रूपात आवडू लागते.

बाजरी बिस्किट्स - चवदार आणि आरोग्यदायी पर्याय

जर मुलांना पारंपरिक बाजरी खायला आवडत नसेल, तर त्याच पोषणमूल्यांनी भरलेली बिस्किटं तुम्ही घरच्या घरी बनवू शकता. ही बिस्किटं बाजारात विक्रीसाठीही एक चांगला स्टार्टअप आयडिया ठरू शकते.

बाजरी बिस्किट्सची पाककृती

साहित्य

बाजरी पीठ - १ कप

साखर - १/४ कप (आवडीनुसार)

तूप - १/४ कप

दूध - १/२ कप

बेकिंग पावडर - १ चमचा

सोडियम बायकार्बोनेट - १/२ चमचा

सूंठ - १/४ कप (चवीनुसार)

साखर पावडर - १/४ चमचा

मीठ - चिमूटभर

कृती

१. एका मोठ्या भांड्यात बाजरी पीठ, बेकिंग पावडर, सोडा व मीठ मिक्स करा.

२. त्यात साखर, तूप आणि सुंठ घालून नीट मिक्स करा.

३. हळूहळू दूध घालत गुळगुळीत पीठ भिजवा.

४. पिठाचे छोटे गोळे घेऊन मनपसंत आकारात बिस्किटं बनवा.

५. ओव्हन १८०°C (३५०°F) वर प्रीहीट करून बिस्किटं १५ - २० मिनिटं बेक करा.

६. बेक झाल्यावर थंड करून हवाबंद डब्यात साठवा.

घरासाठी आणि व्यवसायासाठीही उपयुक्त

बाजरी बिस्किट्स केवळ घरगुती आरोग्यदायी पर्यायच नाहीत, तर घरगुती व्यवसायाचा उत्तम मार्ग देखील ठरू शकतो. मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत प्रत्येकासाठी हे स्नॅक्स पौष्टिक, चवदार आणि सुरक्षित ठरतात.

आजच्या युगात मुलांना पोषणमूल्ययुक्त, घरगुती आणि रसायनमुक्त पर्याय देणं गरजेचं आहे. बाजरी बिस्किट्स हा एक असा पर्याय आहे जो चव, आरोग्य आणि आधुनिकतेचा मेळ साधतो. तर, मग आजच या बिस्किटांची पाककृती करून पाहा आणि आपल्या मुलांच्या आहारात आरोग्याची गोडी वाढवा!

# मुलांच्या भविष्याला वाईट वळण लावू शकतात पालकांच्या या चुका!

पालक म्हणून आपण खूप सजग राहण्याचा प्रयत्न करत असतो. पण इतर बऱ्याच व्यापामुळे काही गोष्टींकडे लक्ष जात नाही किंवा दुर्लक्ष होतं. मुलांच्या चुकीच्या वागण्यातून या गोष्टी स्पष्ट होत जातात आणि मग 'पालक म्हणून आपण चुकलो' ही भावना मनात ठाण मांडून राहते. घरातील वडीलधाऱ्या किंवा इतर कोणी मुलांना रागावलं तर त्यांना ते आवडत नाही. परंतु आपल्या मुलाच्या भविष्यासाठी पालकत्वात काही कमतरता आहे का हे आपण इथे दिलेल्या लक्षणांवरून ओळखू शकता.

मोठ्या लोकांशी उद्धटपणा

आपली मुलं जर घरातील वडीलधाऱ्यांशी चुकीचं वागत असतील, त्यांना अनादराची वागणूक देत असतील किंवा त्यांच्याशी बरोबरी करण्याचा प्रयत्न करत असतील, तर हे पालकत्वातील कमतरतेचं लक्षण आहे.

घरकाम करायला नकार

आपल्याला नेहमीच शिकवलं गेलंय की आपण आपल्या वडिलधाऱ्या व्यक्तींचं आज्ञापालन केलं पाहिजे. पण बऱ्याचदा मुलं मोठ्यांनी सांगितलेली कोणतीही कामं करायला लगेच नकार देतात. अगदी फक्त एक ग्लास पाणी आणण्याचं काम कोणी सांगितलं असलं तरीही मुलं नकार देतात.

उद्धट भाषेत संभाषण

एखाद्या लहान मुलापासून ते किशोरवयीन मुलापर्यंत, एखादा मुलगा किंवा मुलगी वाईट प्रकारे वागत असेल, इतर मुलांना धमकावत असेल किंवा उद्धटपणे बोलत असेल, तर हेही पालकत्वाच्या अभावाचं एक मोठंच लक्षण आहे. मुलांची ही सवय तुम्हाला इतरांसमोर खूप लाजिरवाणी भावना देऊ शकते. आणि म्हणूनच सगळ्यात आधी मूल हे कुठून शिकत आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

पैशांची किंमत नसणं

एखादी वस्तू केवळ इच्छेपोटी खरेदी करायची की गरजेपोटी, हे समजून घेणं खूप महत्वाचं आहे. मुलांना त्याच्या किशोरावस्थेपर्यंत पैशाचं मूल्य समजलं नसेल, तर ही तुमच्या पालकत्वातील एक मोठी त्रुटी आहे.

इंटरनेटवर नको ते पाहणं

लहान मुलांपासून ते किशोरवयीन मुलांपर्यंत, टीव्ही किंवा सोशल मीडियावर कोणता कंटेंट पाहत आहेत याचा ट्रॅक ठेवावा लागेल. नाहीतर अनाठायी प्रायव्हसी आणि सौम्य पालकत्वाच्या नावाखाली तुमचं मूल बिघडण्यास वेळ लागणार नाही.



PARENTING TIPS

# महापालिका आरोग्य स्वयंसेवकांचा निवडणूक कामाला नकार; जबरदस्ती केल्यास न्यायालयात दाद मागणार



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई महापालिकेची निवडणूक तोंडावर आलेली असताना महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अंतर्गत काम करणाऱ्या तीन हजारांपेक्षाही जास्त आरोग्य स्वयंसेविकांनी निवडणुकीच्या कामाची जबाबदारी स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन आणि निवडणूक आयोग यांना काहीसा धक्काच बसला आहे.

मुंबई महापालिकेने गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य खात्यात विविध योजनांवर काम करणाऱ्या तीन हजारांपेक्षा जास्त आरोग्य स्वयंसेविकांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा दर्जा नाकारत कायमस्वरूपी सेवेत सामावून घेतलेले नाही. त्याचा तीव्र स्वरूपाचा राग या आरोग्य स्वयंसेविकांनी मनात धरला आहे. आम्ही जर महापालिकेचे कर्मचारी नाहीत, असे पालिकेचे म्हणणे असेल तर आम्ही पालिका निवडणुकीचे काम का करावे, असा सवाल करीत त्यांनी निवडणूक कामकाज करण्यास स्पष्ट नकार दर्शवला आहे.

वास्तविक, मुंबईत उन्हाळा, हिवाळा असो की पावसाळा असो पालिका आरोग्य खाते तीन हजारांपेक्षा जास्त आरोग्य स्वयंसेविकांना अल्प मानधनात हवे तसे राबवून घेते. पालिकेच्या आरोग्य खात्यातील कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे काम करवून घेतले जाते, मात्र त्यांच्यासारखे वेतन आणि सेवासुविधा दिल्या जात नाहीत, अशी या आरोग्य स्वयंसेविकांची खंत आहे. तसेच पावसाळ्यात हिवताप, डेंग्यू आदी आजार डोके वर काढतात. मोठ्या प्रमाणात रुग्णांची संख्या वाढते. त्यामुळे साथीच्या आजारांविषयी जनजागृती करणे, कोणती काळजी घ्यावी याची माहिती देणे, डासांचा प्रादुर्भाव होत असलेल्या, तसेच डासांची उत्पत्ती स्थाने शोधणे आदी काम करण्यात आरोग्य स्वयंसेविका पुढे असतात.

महापालिका प्रशासनाकडून आरोग्य स्वयंसेविकांची निवडणूक बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात येऊन काम सोपवण्यात येणार आहे. मात्र हे काम करण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला आहे. तसेच, या आरोग्य स्वयंसेविकांपैकी अनेक स्वयंसेवक हे राजकीय पक्षांशी संबंधित असून अनेक जण 60 वर्षांवरील आहेत. त्यामुळे यांनाही निवडणुकीचे काम दिले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून मांडला जात आहे.

निवडणूक काम लादल्यास न्यायालयात दाद मागणार


पालिका निवडणूक तोंडावर आल्याने महापालिका प्रशासनाकडून, सदर आरोग्य स्वयंसेविकांना निवडणुकीचे काम करण्याबाबत नेमणूक पत्र घेण्यास जबरदस्ती करण्यात येत आहे, असा आरोप मुंबई मनपा आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ऍड. प्रकाश देवदास यांनी केला आहे. त्यांनी असेही म्हटले की, पालिकेने निवडणूक कामासाठी जबरदस्ती केल्यास याप्रकरणी आवश्यकता भासल्यास मुंबई उच्च न्यायालयात याचिका करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मात्र निवडणुकीचे काम न केल्या कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाकडून दिला जात आहे. एकीकडे आरोग्य स्वयंसेविका महापालिकेच्या कर्मचारी नाहीत, तर मग त्यांच्यावर कारवाई कशी करणार, असा सवालही कामगार नेते देवदास यांनी उपस्थित केला आहे.

# धारावी पुनर्विकासाची सर्वेक्षणाची मुदत संपली, तरीही स्थानिकांना सामील होण्याची संधी

**■मुंबई। प्रतिनिधी:**

धारावीचा पुनर्विकास केला जात आहे. यासाठी येथील घरांचे आणि कागदपत्रांचे सर्वेक्षण सुरु होते. त्यातील घरोघरी जाऊन करण्यात येणाऱ्या (डोअर -टू -डोअर) सर्वेक्षणाचा आजचा (12 ऑगस्ट 2025) अखेरचा दिवस होता. डोअर टू डोअर सर्वेक्षण 12 ऑगस्टला संपणार असल्याची माहिती जुलै महिन्यातच धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) वतीने देण्यात आली होती. पोस्टर्स आणि प्रसिद्धीमाध्यमांद्वारे सर्वेक्षणाच्या अंतिम मुदतीबाबत स्थानिकांना अवगत करण्यात आले होते. तरीही स्थानिकांना यात सामील होण्याची संधी आहे कशी ते वाचा...



धारावी सर्वेक्षणाच्या अंतिम मुदतीबाबत अद्ययावत माहिती जारी करण्यात आली आहे. धारावीतील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. त्यासाठी घरोघरी जाऊन करण्यात येणाऱ्या (डोअर -टू -डोअर) सर्वेक्षणाचा आजचा (12 ऑगस्ट 2025) अंतिम दिवस होता. हे घरोघरी जाऊन करण्यात येणारे सर्वेक्षण 12 ऑगस्टला संपणार असल्याची माहिती धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्यावतीने (डीआरपी) जुलै महिन्यातच जाहीर केले होते. सर्वेक्षणाच्या अंतिम मुदतीबाबत पोस्टर्स आणि प्रसारमाध्यमांद्वारे स्थानिकांना अवगत करण्यात आले होते. आता डोअर टू डोअर सर्वेक्षणाची मुदत संपली असली.

तरी स्थानिकांना अद्यापही पुनर्विकासात सामील होण्याची संधी उपलब्ध आहे. सर्वेक्षण यादीत स्वतःचे नाव नोंदविण्यासाठी स्थानिकांना डीआरपी हेल्पलाईनवर संपर्क साधता येईल अथवा आवश्यक कागदपत्रांसह धारावीतील डीआरपी/एनएमडीपीएल कार्यालयाला भेट देता येणार आहे. धारावीतील ज्या ठिकाणी पूर्वी डोअर टू डोअर सर्वेक्षण करण्यात आले आहे, अशा ठिकाणी नव्याने डोअर टू डोअर सर्वेक्षण होणार नसल्याचे डीआरपीने स्पष्ट केले आहे.

विनंतीचा अर्ज दाखल करावा लागेल

सर्वेक्षणात सहभागी होण्याची संधी गमावलेल्या स्थानिकांबाबत पुनर्विचार जरूर करण्यात येईल. मात्र, त्यासाठी परिशिष्ट 2 प्रसिद्ध झाल्यानंतर सदनिकाधारकाला (सर्वेक्षणात सामील करून घेण्याच्या) विनंतीचा अर्ज दाखल करावा लागेल. धारावी पुनर्विकास प्रकल्पात ह्यप्रत्येकाला घरह्ल हे धोरण राबविले जाणार असून हक्काच्या घरासोबतच स्थानिकांना रोजगाराची हमी देण्यासाठी डीआरपी कटीबद्ध आहे.

87,500 हून अधिक सदनिकांचे सर्वेक्षण पूर्ण

आतापर्यंत 87,500 हून अधिक सदनिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून 1 लाखांहून अधिक सदनिकांवर सर्वेक्षण क्रमांक टाकण्यात आला आहे. कोणत्याही कारणाने अद्याप सर्वेक्षणात सहभागी न होऊ शकलेल्या धारावीकरांनी त्यांच्या सदनिकेवर क्रमांक टाकण्याची प्रक्रिया राबविण्यासाठी त्वरित पुढाकर घेणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना पुनर्विकासाचा लाभ घेता येईल.

# पश्चिम रेल्वेसाठी ३ वर्षांचा रोडमॅप तयार, प्रवाशांना मोठा फायदा; कुठे, कोणत्या मार्गावर काम सुरू?



**■मुंबई। प्रतिनिधी:**

लोकल ट्रेन ही मुंबईची लाइफलाइन आहे. दररोज लाखो लोक या लोकलने प्रवास करतात. चाकरमान्यांसाठी तर लोकल ट्रेन त्यांच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग झाला आहे. एक दिवस लोकल सेवेत काही बिघाड झाला, तर त्याचा मोठा परिणाम मुंबईकरांसह त्यांच्या पुढील संपूर्ण कामावर होताना दिसतो. प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे लोकल ट्रेनबाबत अधिक चांगल्या सुविधा देणं गरजेचं ठरत आहे. अशात पश्चिम रेल्वेसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. उपनगरीय रेल्वे सेवांना चालना देण्यासाठी एक रोडमॅप तयार केला आहे. हा रोडमॅप तीन वर्षांचा असेल अशी माहिती रेल्वे बोडार्चे अध्यक्ष सतीश कुमार यांनी दिली. मुंबई भेटीदरम्यान त्यांनी ही योजना सादर केली आहे.

कुठे, कोणत्या मार्गावर काम सुरू?

खार रोड आणि डहाणू दरम्यान नव्या मार्गांचं बांधकाम सुरू आहे. नवीन रेल्वे कॉरिडॉर पूर्ण झाल्यास याचा मोठा फायदा होईल. यामुळे उपनगरीय लोकल वाहतूक आणि एक्सप्रेस गाड्या यांचे मार्ग वेगळे होतील. लोकल आणि मेल यांचे मार्ग वेगळे झाल्यामुळे लोकलला येणारे अडथळे दूर होतील आणि प्रवाशांना याचा मोठा फायदा होईल. प्रवास अधिक जलद आणि विना अडथळे होण्यास मदत होईल.

५ नोव्हेंबर २०२३ रोजी वांद्रे टर्मिनस आणि गोरेगाव दरम्यानचा सहावा मार्ग सुरू झाला. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२४ रोजी गोरेगाव-कांदिवली मार्ग सुरू झाला. ऑक्टोबर २०२५ पर्यंत कांदिवली-बोरिवली हा मार्ग तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे वांद्रे टर्मिनस-बोरिवली कॉरिडॉर पूर्ण होईल.

तर बोरिवली आणि विरार दरम्यान पाचव्या

# पाच महिन्यांत एकही नवा अर्ज नाही



गेल्या पाच महिन्यांत एकही नवा अर्ज प्राप्त झालेला नाही, हे यातून अधोरेखित झाले. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण पडत असल्याचे

**■मुंबई। प्रतिनिधी:**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला सत्तेपर्यंत पोहोचविणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत गेल्या पाच महिन्यांत एकही नवा अर्ज प्राप्त झालेला नाही. त्याच वेळी पुणे जिल्ह्यात सर्वाधिक लाडक्या बहिणींनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडे लाडकी बहीण योजनेची सद्यस्थिती काय, किती जणांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, अशी विचारणा करणारा अर्ज माहितीच्या अधिकारांतर्गत दाखल करण्यात आला होता. त्यास उत्तर देताना विभागाचे कक्ष अधिकारी संतोष दळवी यांनी वरील माहिती दिली. सत्ताधारी पक्षाचे आमदार खासगीत बोलत असतात. तिजोरीवर पडत असलेल्या ताणामुळे आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील अनेक योजनांसाठी निधी देण्यात सरकार हात आखडता घेत असल्याचीही वदंता आहे. एकही नवा अर्ज आला नसल्याने हळूहळू या योजनेची व्याप्ती कमी करण्याचा सरकारचा विचार असावा, असाही प्रश्न त्यानिमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे.

**योजनेची सद्यस्थिती**

1. पात्र महिला- १,५९,५६,९६७
2. पाच महिन्यांत दाखल झालेले अर्ज- शून्य
3. सर्वाधिक पात्र लाभार्थी- पुणे जिल्हा

# यंदाची सर्वात मोठी हंडी कोणती? किती असणार बक्षीस?

**■मुंबई। प्रतिनिधी:**

अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारा दहीहंडी उत्सव अवघ्या दोन दिवसावर आला आहे. सध्या मुंबई आणि संपुर्ण महाराष्ट्रात दहीहंडीसाठी गोविंदा पथकांची तयारी जोरदार सुरू आहे. मुंबई, ठाणे, कल्याण यांसह ठिकठिकाणी भव्य दिव्य आयोजन करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे मुंबईतील लालबाग, दादर, वरळी या ठिकाणी दहीहंडीचा उत्सव धुमधडाक्यात पाहायला मिळतो. तसेच मुंबईच्या उपनगरात देखील अनेक ठिकाणी भव्य दहीहंडी आयोजित केल्या जातात. ठाण्यातील संस्कृती युवा प्रतिष्ठानची दहीहंडी ही सर्वात मोठी साजरी केली जाते. यावर्षी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकाराने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीचे यावर्षी 20 वे वर्ष आहे. त्यानिमित्ताने त्यांच्याकडून मोठी बक्षीसे जाहीर करण्यात येणार आहेत.



111 स्पॅनिश खेळाडू होणार सहभागी - प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीची यंदाची थीम शोले चित्रपटावर आधारित असनार आहे. या उत्सवात 111 स्पॅनिश खेळाडूंचा सहभागी होणार आहेत. तसेच, साहसी पिरॅमिडचा थरार दाखवला जाणार आहे. यामुळे यंदाच्या दहीहंडीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. स्पेनमधील 111 खेळाडूंचे पथक गेट वे ऑफ इंडिया मधून सलामी देणार आहेत व आपला थरार सुरू करणार आहेत.

किती थरांसाठी बक्षीस?

यावर्षी जागतिक विक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकाला तब्बल 21 लाख रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले असून 9 थर लावणाऱ्या पहिल्या पथकाला 11 लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच, 8 थर लावणाऱ्या पथकाला 25 हजार, 7 थरांसाठी 15 हजार आणि 6 थरांसाठी 10 हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, महिला पथकांनाही 7 थर लावण्याचे आव्हान असून, त्यांनाही त्याप्रमाणे योग्य बक्षिसे दिले जाणार आहेत. सर्व गोविंदांना हेल्मेट, सेफ्टी किट, मॅट आणि जॅकेट अनिवार्य असणार आहे. तसेच, 1 लाख 26 हजार गोविंदांचा विमा काढला आहे. या दहीहंडी उत्सवात अनेक सिनेसृष्टीतील लोकप्रिय कलाकार सहभागी होणार आहेत. धर्मवीर आनंद दिघे मानाची दहीहंडी - ठाण्यात संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या या भव्य दहीहंडीसोबतच टेंभी नाका येथे धर्मवीर आनंद दिघे दहीहंडी आणि पाचपाखाडी येथे आमदार जितेंद्र आव्हाड यांची दहीहंडी यांसारखे मोठे दहीहंडी उत्सव ठाण्यात प्रसिद्ध आहेत. मात्र, विक्रमी बक्षिसे आंतरराष्ट्रीय स्पर्धक आणि अनोख्या संकल्पनांमुळे संस्कृती युवा प्रतिष्ठानची दहीहंडी नेहमीच केंद्रस्थानी असते. ठाण्याच्या टेंभी नाका येथे धर्मवीर आनंद दिघे हा मानाची दहीहंडी आयोजीत केली जाते, शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही दहीहंडी आयोजित केली जाते.

# तलाव परिसरात यंदा कमी पाऊस; पाणीसाठ्यात किंचितशी घट



**■मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही प्रमुख तलावांमध्ये पावसाने जुलै महिन्यापर्यंत दमदार हजेरी लावली. मात्र, यावर्षी झालेला पाऊस गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाल्याचे समोर आले आहे. तसेच मागील काही दिवसांत पावसाने विश्रांती घेतल्याने एकूण पाणीसाठ्यात किंचितशी घट झाली आहे. अशी आकडेवारी समोर आली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणापैकी अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मिडल वैतरणा आणि भातसा यांसारख्या मोठ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रात यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी पाऊस झाला आहे. दरम्यान मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जाहीर केलेल्या अहवालानुसार, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये आजमितीस ८९.२० टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, गेल्यावर्षी याच दिवशी ९२.५५ टक्के पाणीसाठा धरणांमध्ये उपलब्ध होता, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे. यावर्षी विहार आणि तुळशी या दोन तलावांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाऊस झाला आहे. विहार तलावात यावर्षी २७२० मिमी पाऊस झाला, तर गेल्या वर्षी यावेळेत या तलावात २४०० मिमी पाऊस पडला होता. तर तुळशी तलावात यावर्षी ३३०९ मिमी पाऊस झाला असून गेल्या वर्षी ३३६३ मिमी पाऊस झाला होता.

# नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेची उत्कृष्ट कामगिरी – चोरीला गेलेले ₹६.२९ लाखांचे दागिने केवळ ४ तासांत हस्तगत

**■नायगाव (ता. वसई, जि. पालघर):**

भजनलाल डेअरी, कामण, नायगाव पूर्व येथे २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळच्या सुमारास घडलेल्या दागिने चोरीप्रकरणी नायगाव पोलिसांनी अवघ्या ४ तासांत कारवाई करत आरोपीस अटक केली असून, चोरी गेलेले ₹६,२९,३०६/- किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने १००% हस्तगत करण्यात आले आहेत.घटना अशी की, फियार्दी व त्यांच्या कुटुंबियांनी नालासोपाऱ्याहून कल्याण येथे जाण्यासाठी रॅपिडो ॲपवरून कॅब (Ride ID: RD 17541006795076963) बुक केली होती.

चालक संदेश टोपरे (रा. निळमोरेगाव, नालासोपारा) याने गाडी क्रमांक MH-01-EM-5717 मधून सर्वांना घेऊन जात असताना भजनलाल डेअरी, कामण येथे गाडी थांबवून, महिलावर्ग वॉशरुमसाठी उतरले असता, संधीचा फायदा घेत आरोपीने बॅगेसह सोन्याचे दागिने घेऊन गाडीसह फरार झाला.या घटनेवरून नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासाच्या अनुषंगाने, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने आरोपी संदेश टोपरे याला कांदिवली, मुंबई येथून अटक करण्यात आली. कौशल्यपूर्ण चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडूनः ₹६,२९,३०६/- किंमतीचे दागिने,चोरीस वापरलेली ₹५ लाख किंमतीची मारुती वॅगनर कार जप्त करण्यात आली आहे.

ही कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा. श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, मा. श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अभिजीत मडके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/गणेश केकान, पोउपनिरी/ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, पो. अंम. सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पाडुरंग महाले, पोहवा/अमोल बरडे नेमणुक पो.उप आयुक्त सॊ परिमंडळ नं ०२, वसई यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

# मुंबईत खेकड्यांमुळे बाप लेकांचा गेला जीव, नॅशनल पार्कमध्ये काय घडलं?

**■दिल्ली। प्रतिनिधी:**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कांदिवली पूर्व परिसरातील रामगड येथे खेकडे पकडण्यासाठी गेलेल्या वडील आणि मुलाचा तलावात बुडून मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत वडिलांचे नाव एकनाथ पाटील वय 50 आणि मुलाचे नाव वैष्णव पाटील वय 12 होते. कांदिवली पूर्व येथील क्रांतीनगर येथे ते राहत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता.

तलावात बुडून मुलाचा आणि वडिलांचा दुर्दैवी मृत्यू

समता नगर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी दुपारी 12.30 वाजता घडली. जेव्हा मुलगा



तलावात बुडत होता, त्यावेळी वडीलही त्याला वाचवण्यासाठी गेले. परंतु वडील आणि मुलगा दोघांचाही बुडून मृत्यू झाला. आपल्या पोटच्या मुलाला तलावात बुडताना पाहून त्यांनी पाण्यात उडी घेतली. मात्र, मुलाला वाचवण्यात त्यांना यश मिळाले नाही आणि तेही पाण्यात बुडाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घेतली घटनास्थळी धाव

अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून दोघांनाही तलावाबाहेर काढले. या घटनेनंतर पोलिसांनी एडीआर अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या घटनेनंतर माजी खासदार गोपाल शेट्टी यांनी मोठे आरोप केले आहेत. भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी म्हणाले की, बोरिवली पश्चिमेतील झाशी की राणी तलावात एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला तेव्हा आम्ही आंदोलन केले होते.

माजी खासदार गोपाल शेट्टी यांनी केले थेट आरोप

त्यावेळी आम्ही कारवाईची मागणी केली होती. पण अजूनही कुठलाही प्रकारची कारवाई करण्यात आली नाहीये. जर त्या दिवशी कारवाई केली असती तर आज यंत्रणा सतर्क असती आणि असे बुडून मृत्यू झाले नसते. मीडियाच्या माध्यमातून पुन्हा एकदा मुंबई पोलिस आणि मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांना आव्हान करतो आणि विनंती देखील करतो, याच्यापुढे कोणाची मृत्यू होऊ नये, याकरिता कडक पाऊले उचलली पाहिजेत आणि कारवाई केली पाहिजे. वडील आणि मुलाच्या मृत्यूमुळे पाटील कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com